# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)

तालुका – आंबेगाव, जिल्हा – पुणे – ४१२४०५

दूरध्वनी – ०२१३३-२३०५८२, E-mail: gcoeara@gmail.com


ई-निविदा जा.क्र.:शा.अ.व.सं.म.अ./भांडार/२०१९ / 2325 दि. 27 JUN 2019

## ई - निविदा सूचना

या महाविद्यालयातील साफसफाई व बागकाम ई-निविदा मागवून बाह्यस्त्रोतांकडून करून घ्यावयाचे आहे. त्याकरिता नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दोन लिफाफे पद्धतीने ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेच्या अटी व शर्ती बाबतच्या सूचना निविदेत दिलेल्या आहेत. निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक १०-०७-२०१९ असा आहे. निविदा प्रपत्र, निविदेत जोडावयाची कागदपत्रे, निविदाकाराने पाळावयाच्या अटी व शर्ती यांचा तपशील महाविद्यालयाची वेबसाईट www.gcoeara.ac.in व महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर उपलब्ध आहेत. निविदाकारांना निविदा सादर करण्यासंबंधी काही शंका असल्यास त्याचे निराकरण निविदापूर्व बैठकीत करण्यात येईल.

### ई निविदा संबंधी महत्वाची माहिती

| अ. क्र. | विवरण | माहिती |
|---|---|---|
| १ | ई-निविदा नोटीस प्रसिद्धी | https :// www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे |
| २ | कामाचे स्वरूप | शा.अ.व.सं.म. अवसरी (खुर्द) येथील साफसफाई व बागकाम करण्यासाठी मनुष्यबळ सेवा पुरवठा ११ महिन्यांसाठी करणे |
| ३ | ई-निविदा शुल्क | रुपये ३०००/- ऑनलाईन पद्धतीने ई-निविदा संकेतस्थळावर भरण्यात यावे |
| ४ | बयाणा रक्कम | रुपये ५००००/- (परतावा योग्य ) |
| ५ | संपर्कासाठी पत्ता | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द), तालुका – आंबेगाव, जिल्हा – पुणे ४१२४०५ |
| ६ | दूरध्वनी क्रमांक | ०२१३३-२३०५८० |
| ७ | ई मेल आय. डी. | gcoeara@gmail.com |
| ८ | ई-निविदा संकेतस्थळ | **https:// www.mahatenders.gov.in** |
| ९ | ई-निविदा वैधता | ९० दिवसांकरिता |
| १० | ई-निविदापूर्व बैठकीचे स्थळ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द), प्रशासकीय इमारतीतील सभागृह |

सर्व पात्र निविदाकारांनी तांत्रिक निविदा व वाणिज्यिक निविदांची वेगवेगळी पाकिटे डिजिटल स्वाक्षरीने सीलबंद करून सदर निविदा ऑनलाईन पद्धतीने www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सादर करावी. अन्य कोणत्याही पद्धतीने या कार्यालयास सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

27/06/2019

( डॉ. अविनाश पंत )

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,

अवसरी (खुर्द)

**महत्वाच्या तारखा:**

ई निविदा भरण्यासंदर्भात महत्वाच्या तारखा खालील तक्त्यात देण्यात येत आहेत. निविदाकाराने सदर तारखांचे पालन करावे.

| अ. क्र. | कार्य विवरण | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | ई निविदा प्रकाशित करणे | २८.०६.२०१९ (सकाळी ११.०० वाजता) |
| २ | संकेतस्थळावरून ई निविदा उपलब्ध करणे | २८.०६.२०१९ (दुपारी १२.०० वाजता) |
| ३ | ई निविदा सादर करण्याचा सुरवातीचा दिनांक | २८.०६.२०१९ (दुपारी १२.०० वाजता) |
| ६ | ई निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १०.०७.२०१९ (सकाळी ११.०० वाजता) |
| ७ | तांत्रिक निविदा छाननी दिनांक | ११.०७.२०१९ (सकाळी ११.०० वाजता) |
| ८ | वाणिज्यिक निविदा उघडणे | १२.०७.२०१९ (सकाळी ११.०० वाजता) |

27.06.19

( डॉ. अविनाश पंत )

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,

अवसरी (खुर्द)

## सफाईकाम व बागकाम निविदाकारांसाठी अटी व शर्ती

१. निविदाकाराकडे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम, १९४८ अंतर्गत नोंदणीचा दाखला व अद्ययावत नूतनीकरणाचा दाखला उपलब्ध असणे आवश्यक असून त्या दाखल्यात धंद्याचे स्वरूप हे "हाऊस कीपिंग अँड लेबर कॉन्ट्रॅक्टर' अथवा "हाऊस कीपिंग कॉन्ट्रॅक्टर' अथवा "लेबर कॉन्ट्रॅक्टर' अथवा तत्सम असणे आवश्यक आहे.

२. कंत्राटदारांनी सफाई व माळी कामगारांचे दरमहा अपेक्षित वेतन रुपयांमध्ये निविदेमध्ये सुस्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. भविष्यात किमान वेतनात शासन निर्णयाद्वारे अथवा परिपत्रकाद्वारे वाढ झाल्यास कंत्राटदाराने त्या वाढीव दराने वेतनाची मागणी महाविद्यालयाकडे करावी. विविध नियमांना अधीन राहून कंत्राटदार या नात्याने भरावे लागणारे सर्व शासकीय कर अथवा देणी याचा उल्लेख करूनच अपेक्षित वेतन नमूद करावे. निविदेमध्ये सुस्पष्टता असली पाहिजे, कोणत्याही प्रकारची खाडाखोड अथवा अपूर्ण उल्लेख इत्यादी आढळल्यास निविदा अस्वीकृत केली जाईल.

३. **सदर कामगारांनी महाविद्यालयात प्रामुख्याने सफाईकाम करणे आवश्यक असून महाविद्यालयाच्या गरजेनुसार बागकाम करणे आवश्यक आहे.** त्यासाठी कंत्राटदारांनी तूर्तास संस्थेला १० सफाई कामगार व ४ माळी कामगार पुरविणे आवश्यक आहे. मात्र सफाई कामगार अथवा माळी कामगार यांची प्रत्यक्ष संख्या आवश्यकतेनुसार कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील. कामगारांचा दररोजचा कामाचा कालावधी किमान आठ तासांचा राहील (सर्वसाधारणप्रमाणे सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.००). आवश्यकतेनुसार त्यात बदल करण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील.

४. कंत्राटदारांनी या कर्मचाऱ्यांचा पुरवठा दिनांक १५.०७.२०१९ पासून ते दिनांक १५.०६.२०२० या अकरा महिन्यांच्या कालावधीसाठी करावयाचा आहे. या कालावधीमध्ये कंत्राटी पद्धतीवरील नेमणुकीबाबत शासनाचे काही वेगळे धोरण ठरल्यास कंत्राटदारांच्या नियुक्तीचा कालावधी दिनांक १५.०६.२०२० पूर्वी संपुष्टात आणण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील. त्यासाठी पूर्वसूचना देणे आवश्यक असणार नाही. अकरा महिन्यांच्या कालावधीमध्ये सफाईकाम व बागकाम समाधानकारक असल्यास कंत्राटदारांना पुढील अकरा महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील.

५. साफसफाई व बागकाम सेवांबाबत खालील प्रमाणे दररोज कामे करणे आवश्यक आहे -

अ. कार्यालयातील व परिसरातील व्हरांडे व जिने झाडणे, फिनेल टाकून पुसणे .

आ. सर्व इमारतीतील संडास व बाथरूम फिनेलने / ॲसिडने स्वच्छ करणे.

इ. सर्व इमारतींचा दर्शनी भाग व सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे. सर्व इमारतीचे व्हरांडे, जिने साफसफाई करणे, जळमटे काढणे.

ई. जमा केलेला ओला व सुका कचरा वेगवेगळा करून कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे. पाणी गळती होत असल्यास त्वरित सूचित करणे.

उ. महाविद्यालय परिसरातील बागकाम, जसे की वृक्षसंवर्धन, गवत काढणे, झाडांना पाणी घालणे व ठिबक सिंचन व्यवस्थेची देखरेख करणे , वृक्षांची सर्व प्रकारे देखभाल करणे.

टीप- सदर कर्मचाऱ्यांनी करावयाच्या दैनंदिन कामाचा तपशील प्राचार्यांकडून / नियंत्रण अधिकारयाकडून कंत्राटदाराच्या पर्यवेक्षकास दिला जाईल.

६. वरील प्रमाणे नियुक्ती करण्यात आलेल्या सफाई कामगारांनी नेमून दिलेल्या वेळापत्रकानुसार काम करणे अपेक्षित आहे. साफसफाईचे व बागकामाचे कामानंतर इतर कामासाठी पूर्णवेळ संस्थेत उपस्थित राहावे लागेल. प्राचार्यांनी / नियंत्रण अधिकाऱ्याने वेळोवेळी आवश्यकतेनुसार नेमून दिलेली इतर कामे करणे सर्व कर्मचाऱ्यांना बंधनकारक राहील. तसेच कंत्राटदारांने सर्व सफाईकामाचे व बागकामाचे नियोजन व देखरेख करण्यासाठी त्यांचे स्तरावरून एक पर्यवेक्षक नेमून देणे आवश्यक राहील. पर्यवेक्षकाचे वेगळे वेतन महाविद्यालयाकडून अदा केले जाणार नाही.

७. कंत्राटदाराने पुरवलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे एकत्रित वेतनावर शासकीय दराने आयकर, जीएसटी व इतर लागू असलेले कर कपात करून कंत्राटदारास रक्कम अदा केली जाईल. सदरची रक्कम कंत्राटदाराच्या बँक खात्यात परस्पर जमा केली जाईल. कोणत्याही परिस्थितीत प्राचार्यांकडून परस्पर संबंधित कर्मचाऱ्यांना वेतन अदा केले जाणार नाही.

८. एकत्रित वेतनाची रक्कम ही दर महिन्यास, महिना पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराकडून देयक प्राप्त झाल्यावर ते शासकीय कोषागारात सादर करून, कोषागाराकडून मंजूर झाल्यानंतरच, अदा करण्यात येईल. या रकमेपोटी कोणतेही अग्रीम अनुज्ञेय असणार नाही व देयक प्रदानास उशीर झाल्यास कोणतेही व्याज देय राहणार नाही. तसेच कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थित दिवसांची वेतन दरानुसार कपात करण्यात येईल. काही तांत्रिक कारणाने संस्थेकडून वेतन देण्यास विलंब झाला तरी कंत्राटदाराने प्रत्येक महिन्याच्या सात तारखेपर्यंत सफाई व माळी कर्मचाऱ्यांना वेतन अदा करणे आवश्यक राहील. कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही फायदे अथवा अन्य भत्ते या संस्थेकडून देय नाहीत. तसेच या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचा अन्य नियमित नियुक्तीशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही.

९. सफाई व बागकाम कामगारांना आवश्यक ते सफाई / बागकाम साहित्य, उपभोग्य सामान संस्थेकडून पुरविले जाईल.

१०. कंत्राटी पद्धतीने पुरविण्यात येणारे कर्मचारी प्रामाणिक, विश्वासू व निर्व्यसनी असल्याची खात्री कंत्राटदारांनी करून अश्याच कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे आवश्यक राहील. एखाद्या कर्मचाऱ्याचे काम समाधानकारक नसल्यास प्राचार्यांच्या / नियंत्रण अधिकाऱ्याच्या सूचनेनुसार कंत्राटदारांनी त्याऐवजी दुसरा कर्मचारी लवकरात लवकर पुरविणे आवश्यक राहील. कर्मचारी

कामावर असताना त्यांनी मद्यपान अथवा अंमली पदार्थ सेवन केल्याचे आढळून आल्यास त्याच्या बदली इतर कर्मचारी देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

११. सफाई / बागकाम कामगारांबाबत कोणत्याही प्रकारचा दावा / अपघात / नुकसान भरपाई व उपचार खर्च / तक्रार इत्यादीची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यास संस्था कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे संस्थेच्या मालमत्तेचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई देण्याची जबाबदारी कंत्राटदारांची राहील.

१२. सफाई / बागकाम कामगारांना शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे ही कंत्राटदारांची जबाबदारी राहील. किमान वेतन नियम १९४८, वेतन प्रदान अधिनियम १९३६, कामगार नुकसान भरपाई अधिनियम १९२३, राज्य कामगार विमा अधिनियम १९४८, भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ इत्यादी सर्व कायद्यातील तरतुदींचे पालन करणे आणि संबंधित कायद्यानुसार आवश्यक ती माहिती व नोंद रजिस्टर्स कंत्राटदारांकडे अद्ययावत ठेवलेली असणे आवश्यक आहे तसेच जी एस टी कायद्याखाली कंत्राटदारांची नोंदणी असणे आवश्यक आहे. संबंधित कंत्राटदाराकडे कंत्राटी कामगार अधिनियम १९७० नुसार परवाना असणे आवश्यक आहे. या बाबींची नोंद घेऊनच कंत्राटदारांनी सफाई व बागकाम कामगार यांच्यासाठी अपेक्षित असलेल्या दरमहा वेतनाचे दर निविदेत नमूद करावे.

१३. महाविद्यालयातील मुलींचे वसतिगृहासाठी महिला कामगार आवश्यक असल्याने कंत्राटदाराने आवश्यकतेनुसार कमी-अधिक प्रमाणात महिला कामगार पुरविणे आवश्यक राहील.

१४. कंत्राटदारांनी मागील महिन्याचे वेतन कर्मचाऱ्यांना अदा केल्याचा लिखित पुरावा संस्थेला वेळोवेळी सादर करणे आवश्यक राहील.

१५. प्रस्तुत कामगारांचे काम कंत्राटदाराने अन्य कंत्राटदारास पोट ठेक्याने देता येणार नाही. असे आढळून आल्यास सदर कंत्राट ताबडतोब रद्द केले जाईल.

१६. सफाई कामगार व बागकाम कामगारांना मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील. त्यांना मराठी भाषेत देण्यात येणाऱ्या सूचना समजणे आवश्यक आहेत.

१७. कंत्राटदारांचे काम असमाधानकारक आढळल्यास सदर करार तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील. कंत्राटदारांना काही कारणास्तव सदर करार संपुष्टात आणावयाचा असल्यास त्यांनी संस्थेला दोन महिन्याची पूर्वसूचना देणे आवश्यक राहील.

१८. कंत्राटदारांनी कंत्राट स्वीकारल्यानंतर वेळोवेळी शासनास इन्कम टॅक्स, जी एस टी इत्यादी सर्व टॅक्स भरल्याचा कागदपत्रांचा पुरावा आवश्यक भासल्यास प्राचार्यांना सादर करावा लागेल.

१९. कंत्राटदाराने सदरच्या कामगारांचे हजेरी पत्रक कामाच्या ठिकाणी ठेवणे व त्यावर कामाच्या सुरुवातीसच हजेरी मांडणे आवश्यक आहे. प्राचार्यांना केव्हाही ते हजेरी पत्रक तपासण्याचा अधिकार राहील व तपासणीमध्ये कामगार कामावर न आढळल्यास त्यांची गैरहजेरी धरली जाईल.

२०. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पुरवठ्याबाबत वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असतील तरच कंत्राटदारांनी ऑनलाइन निविदा भरावी. कंत्राटदारांची निविदा स्वीकृत झाल्यास कंत्राटदारांना वरील प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा रु. १००/- (रुपये शंभर फक्त) च्या स्टॅम पेपर वर नोटरी समोर करून द्यावा लागेल. कंत्राटदार यांची मान्य झालेली निविदा, वर्क ऑर्डर हे प्रस्तुतच्या करारनाम्याचा अविभाज्य भाग राहतील. करारनामा महाविद्यालयाकडे सादर केल्यानंतरच प्राचार्यांकडून कर्मचाऱ्यांच्या पुरवठ्याचे आदेश दिले जातील.

२१. प्राप्त झालेल्या कोणत्याही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण नमूद न करता नाकारण्याचा अधिकार प्राचार्यांकडे राखीव असेल.

२२. **किमान वेतन कायद्यानुसार देय असलेले वेतन व भत्ते अधिक कंत्राटदारांचे सर्व्हिस चार्जेस / मार्जिन यांच्या एकत्रित रक्कमेचा विचार करून, ज्या निविदाकाराची एकत्रित रक्कम न्यूनतम येईल, त्या निविदाकारास कंत्राट दिले जाईल.** महाविद्यालयाच्या सेवा पुरवठा आदेशाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत, कंत्राटदाराने अकरा महिन्यांच्या कराराच्या एकूण न्यूनतम रकमेच्या ३ टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून बँक गॅरेंटी स्वरूपात महाविद्यालयाकडे जमा करावी लागेल.

२३. प्रत्येक निविदाकारास बयाणा रक्कम म्हणून रु. ५००००/ - (रु. पन्नास हजार फक्त) ऑनलाईन पद्धतीने जमा करावी लागेल. वाणिज्यिक निविदा उघडल्यानंतर नियमानुसार निवड झालेल्या निविदाकाराव्यतिरिक्त इतर सर्वांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल. निवडलेल्या पुरवठादाराची बयाणा रक्कम त्यांनी पुरवठा आदेशाचा स्वीकार केल्यावर व सुरक्षा ठेव तसेच करारनामा सादर केल्यावर परत करण्यात येईल. ज्या निविदा करास सेवा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील त्याने कामास नकार दिल्यास त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२४. निवड झालेल्या सेवा पुरवठादार संस्थेद्वारे काम करणाऱ्या मनुष्यबळास सेवा पुरवठादारांचे ओळखपत्र देणे आवश्यक आहे.

२५. तांत्रिक निविदांच्या लिफाफ्यामध्ये कागदपत्रे सादर करताना (अपलोड करताना) त्यामध्ये खालील कागदपत्रांचा अनुक्रमे समावेश असणे आवश्यक आहे -

अ. निविदाकाराच्या लेटरहेडवर निविदाकाराची सही व शिक्का असलेले स्वतःची किंवा संस्थेची माहिती असलेले विवरणपत्र

आ. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम, १९४८ अंतर्गत नोंदणीच्या दाखल्याची प्रत व अद्ययावत नूतनीकरणाच्या दाखल्याची प्रत (धंद्याचे स्वरूप - "हाऊस कीपिंग अँड लेबर कॉन्ट्रॅक्टर' अथवा 'हाऊस कीपिंग कॉन्ट्रॅक्टर' अथवा "लेबर कॉन्ट्रॅक्टर' अथवा तत्सम असावे )

इ. कंत्राटी कामगार अधिनियम १९७० नुसार वैध परवान्याची प्रत

ई. जी एस टी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत व दि. ०१-०७-२०१७ पासून (अथवा जी एस टी रजिस्ट्रेशन घेतलेल्या दिनांकापासून) दि. ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत जी एस टी रिटर्न्स सादर केल्याच्या पुराव्याची प्रत (Form GSTR-1 व GSTR-3B)

उ. पॅन कार्डची प्रत

ऊ. कामगार भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

ऋ. कामगार राज्य विमा योजना अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

ऌ. महाराष्ट्र राज्य व्यवसाय कर अधिनियम १९७५ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

ऍ. सफाईकाम / बागकाम कर्मचाऱ्यांचा शासकीय / निमशासकीय कार्यालयांना समाधानकारकरित्या पुरवठा करण्याचा दि. १ जानेवारी २०१५ नंतरच्या काळातील किमान ३ वर्षाचा अनुभव असल्याबाबत संबंधित शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत

ऐ. आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ चे आयकर विवरणपत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत

ए. निविदा शुल्क रुपये ३०००/- ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या पावतीची प्रत

ऐ. बयाणा रक्कम रुपये ५००००/- ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या पावतीची प्रत

अ. निविदा धारकावर यापूर्वी कोणत्याही शासकीय / निमशासकीय आस्थापनेद्वारा दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र (affidavit)

२६. इच्छुक निविदाकारांना सूचित करण्यात येते की या महाविद्यालयात सद्यस्थितीत उपलब्ध असलेला शासकीय दस्तऐवज महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग १ ल, उद्योग उर्जा व कामगार विभाग यांची अधिसूचना दिनांक २७ जानेवारी २०१७ मध्ये नमूद केल्यानुसार महाराष्ट्र राज्यातील "सफाईगार किंवा मेहतर" या रोजगारात असलेल्या कामगारांना देय असलेले किमान वेतन दर खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आले आहेत-

| अ.क्र. | कामगारांची वर्गवारी | किमान मूळ वेतन दर (दरमहा रुपये) | | |
|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ १ (महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगर पालिकांच्या हद्दीतील क्षेत्र) | परिमंडळ २ (महाराष्ट्र राज्यातील सर्व अ/ब वर्ग नगर परिषदांच्या हद्दीतील क्षेत्र) | परिमंडळ ३ (परिमंडळ १ व परिमंडळ २ वगळून महाराष्ट्र राज्यातील उर्वरित क्षेत्र) |
| १ | पूर्णकालिक सफाईगार किंवा मेहतर, तत्सम कामगार | १०००० | ९७५० | ९४५० |

सदरच्या किमान वेतन दरामध्ये मूळ वेतन दर , विशेष भत्ता आणि सवलती असल्यास त्यांचे रोख मूल्य यासाठी अनुज्ञेय असलेल्या दरांचा समावेश असेल. हे महाविद्यालय ग्रामपंचायत क्षेत्रात असल्यामुळे या महाविद्यालयात नेमावयाच्या कामगारांसाठी परिमंडळ ३ चे दर लागू आहेत. तसेच कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई-४०० ०५१ यांच्याकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रकटनातील अ.क्र. "४९- सफाईगार व मेहतर कामधंदा" यासाठी दिनांक १ जानेवारी २०१९ ते ३० जून २०१९ या कालावाधीसाठी विशेष भत्याची रक्कम सर्व परिमंडळ करिता रु.२१०८/- प्रती महिना इतकी असल्याचे दिसून येते.

इच्छुक सर्व कंत्राटदारांना सूचित करण्यात येते की त्यांनी वाणिज्यिक निविदेमध्ये दर नमूद करताना वरील माहितीचा विचार करूनच त्यांचे दर भरावेत. त्यांचेकडे महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग १ ल, उद्योग उर्जा व कामगार विभाग यांची अधिसूचना दिनांक २७ जानेवारी २०१७ यानंतरचे उपरोक्त दर्शविलेल्या परिमंडळ ३ साठी रु ९४५०/- या दरापेक्षा अन्य काही वेगळा दर लागू असल्याबाबत नमूद केलेले शासनाचे अधिकृत कागदपत्र (शासकीय अधिकाऱ्याचा शिक्का व सही असलेले कागदपत्र अथवा राजपत्र अथवा शासन निर्णय इ.) उपलब्ध असल्यास त्या कागदपत्राची प्रत जोडून त्यांनी त्याप्रमाणे

[redacted]

आपले वेगळे दर निविदेत नमूद करावेत. मात्र कंत्राटदारांनी सदर कागदपत्राची प्रत जोडली नाही तर संबंधित कंत्राटदाराची निविदा विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

एखाद्या कंत्राटदाराने, परिमंडळ ३ साठी रु ९४५०/- या दरापेक्षा अन्य काही वेगळा दर लागू असल्याबाबत नमूद केलेले शासनाचे अधिकृत कागदपत्र (शासकीय अधिकाऱ्याचा शिक्का व सही असलेले कागदपत्र अथवा राजपत्र अथवा शासन निर्णय इ.) याची प्रत जोडून त्याप्रमाणे वेगळे दर नमूद करून वाणिज्यिक निविदा सादर केल्यास त्याप्रमाणे किमान वेतन दर असल्याचे ग्राह्य धरून संबंधित कंत्राटदाराची निविदा विचारात घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

27/06/2015

( डॉ. अविनाश पंत )
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द)

प्रपत्र क्र ०१

## तांत्रिक निविदा विवरणपत्र (Proforma for Technical Bid)

निविदाकाराने स्वतःच्या लेटरहेडवर खालील नमुन्यात सर्व आवश्यक माहिती भरून, सही / शिक्का करून सदर नमुना स्कॅन करून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर pdf format सादर करावी. त्यासोबत या निविदा सूचनेमध्ये मागणी केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांच्या / प्रमाणपत्रांच्या प्रती स्कॅन करून त्या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक आहे. अपूर्ण निविदा किंवा कंत्राटदाराची स्वाक्षरी नसलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. तांत्रिक निविदामधून पात्र ठरलेल्या निविदाकारांची वाणिज्यिक निविदा दि. १२-०७-२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदाधारकांच्या उपस्थितित उघडण्यात येतील.

| अनु.क्र. | तपशील | शेरा |
|---|---|---|
| १ | निविदाकाराच्या लेटरहेडवर निविदाकाराचा ई मेल, दूरध्वनी क्रमांक, सही व शिक्का असलेले स्वतःची किंवा संस्थेची माहिती असलेले विवरणपत्र | होय / नाही |
| २ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम, १९४८ अंतर्गत नोंदणीच्या दाखल्याची प्रत व अद्ययावत नूतनीकरणाच्या दाखल्याची प्रत (धंद्याचे स्वरूप - "हाऊस कीपिंग अँड लेबर कॉन्ट्रॅक्टर' अथवा "हाऊस कीपिंग कॉन्ट्रॅक्टर' अथवा "लेबर कॉन्ट्रॅक्टर' अथवा तत्सम असावे) | होय / नाही |
| ३ | कंत्राटी कामगार अधिनियम १९७० नुसार वैध परवान्याची प्रत | होय / नाही |
| ४ | जी एस टी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत व दि. ०१-०७-२०१७ पासून (अथवा जी एस टी रजिस्ट्रेशन घेतलेल्या दिनांकापासून) दि. ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत जी एस टी रिटर्न्स सादर केल्याच्या पुराव्याची प्रत (Form GSTR-1 व GSTR-3B) | होय / नाही |
| ५ | पॅन कार्डची प्रत | होय / नाही |
| ६ | कामगार भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत | होय / नाही |
| ७ | कामगार राज्य विमा योजना अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची प्रत | होय / नाही |
| ८ | महाराष्ट्र राज्य व्यवसाय कर अधिनियम १९७५ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची प्रत | होय / नाही |
| ९ | सफाईकाम / बागकाम कर्मचाऱ्यांचा शासकीय / निमशासकीय कार्यालयांना समाधानकारकरित्या पुरवठा करण्याचा दि. १ जानेवारी २०१५ नंतरच्या काळातील किमान ३ वर्षाचा अनुभव असल्याबाबत संबंधित शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत | होय / नाही |
| १० | आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ चे आयकर विवरणपत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत | होय / नाही |
| ११ | निविदा शुल्क रुपये ३०००/- ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या पावतीची प्रत | होय / नाही |
| १२ | बयाणा रक्कम रुपये ५००००/- ऑनलाईन पद्धतीने भरलेल्यां पावतीची प्रत | होय / नाही |
| १३ | निविदा धारकावर यापूर्वी कोणंत्याही शासकीय / निमशासकीय आस्थापनेद्वारा दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र (affidavit) स्वाक्षांकित करून जोडावे. | होय / नाही |

मी खालील सही करणार असे शपथपूर्व प्रमाणित करतो / करते की वर नमूद करण्यात आलेली माहिती खरी असून कोणतीही माहिती खोटी आढळल्यास होणाऱ्या परिणामांची जबाबदारी माझी राहील. तसेच सदर कंत्राटासाठी आपण नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

स्थळ:
दिनांक:

सही:
नाव:

प्रपत्र क्र ०२

## वाणिज्यिक निविदा विवरणपत्र ( Proforma for Commercial Bid)

निविदाकाराने स्वतःच्या लेटरहेडवर खालील नमुन्यात व्यापारी दरांची माहिती भरून सही / शिक्का करून सदर नमुना स्कॅन करून pdf format मध्ये www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करावा.

१. सेवा पुरवठादाराच्या संस्थेचे नाव:

२. वाणिज्यिक निविदा:

| अ. क्र. | कंत्राटी तत्वावर पुरविण्यात येणाऱ्या सेवेचे वर्णन | प्रतिमहा प्रती कामगारांकरिता आकारण्यात येणारा दर रुपये (Rate per person per month)(सर्व प्रकारचे कर धरून ) कृपया तक्त्याखालील स्पष्टीकरण पहावे. |
|---|---|---|
| १. | महाविद्यालयाच्या परिसरातील व इमारतीमधील साफसफाई व बागकाम करणे | |

**स्पष्टीकरण-**

१. प्रति महा एका व्यक्तीच्या मासिक पगाराच्या तपशिलाची प्रत कंत्राटदाराने त्याच्या लेटरहेडवर स्वतःच्या स्वाक्षरी व शिक्यासह यासोबत अपलोड करावी - त्या तपशिलामध्ये किमान वेतन दरामध्ये मूळ वेतन दर / विशेष भत्ता आणि सवलती असल्यास त्यांचे रोख मूल्य यासाठी अनुज्ञेय असलेल्या दरांचा समावेश करावा. Basic Pay, Dearness Allowance / Special Allowance, ESIC, PF, Contractor's Profit / Margin / Service charges, GST इत्यादी सर्व रक्कमा, जे लागू असेल त्यानुसार, सुस्पष्ट पणे व स्वतंत्र पणे नमूद करून त्या सर्वांची एकत्रित (Total) रक्कम नमूद करावी. **सदरचा तपशील नमूद न करता केवळ एकत्रित दर नमूद केला असल्यास अशी वाणिज्यिक निविदा ग्राह्य धरली जाणार नाही, याची सर्व इच्छुक कंत्राटदारांनी नोंद घ्यावी.**

२. **वाणिज्यिक दर नमूद करताना कंत्राटदारांनी कृपया सफाईकाम व बागकाम निविदाकारांसाठी अटी व शर्ती मधील मुद्दा क्र. २६ वाचावा व त्यामधील सूचनेनुसार आपले दर नमूद करावे.**

स्थळ:

दिनांक:

सही:

नांव:

शिक्का/मोहर